म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ६७३
REFBK-0019489
REFBK-0019489

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६२३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0019489
REFBK-0019489



प्रो. विष्णूपंत छत्रे.



श्री सिद्धारूढ स्वामी (हुबळी).



प्रो. काशिनाथपंत छत्रे.

# वाचकांस विज्ञप्ति.

इंडियन सर्कसचे उत्पादक गायन कलापटु कै. प्रोफेसर विष्णु मोरेश्वर छत्रे यांचे अल्प स्मारक म्हणून ह्या पुस्तकाची चवथी आवृत्ती मी भाविक भजनी लोकांस मोठ्या प्रेमानें अर्पण करीत आहे. ह्या लहानशा पुस्तकाच्या यापूर्वी तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या त्यांत नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीचे मालक रा०रा० वासुदेव सदाशिव पटवर्धन कृत श्री गणपती पंचपदीचाच समावेश केला होता. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं केलेली शिव पंचपदी ही फार प्रेमळ आहे असें वाटल्यावरून ती सामील करून ह्या आवृत्तीस श्री शिवगणेश पंचपदी हें नांव दिलें आहे. पुस्तकाच्या पहिल्या तीन आवृत्त्या प्रोफेसर काशिनाथपंत दादा छत्रे, न्यू इंडियन सर्कसचे मालक, कै० रामकृष्ण बळवंत उर्फ अण्णा साहेब सोमण व त्यांचे बंधू रा. रा. वासुदेव बळवंत सोमण ह्यांच्या उदार आश्रयानें व हुबळी येथील प्रसिद्ध विभूति श्री समर्थ सिद्धारूढ स्वामी ह्यांच्या कृपा प्रसादानेंच प्रसिद्ध करितां आल्या वरील आश्रयदात्यांचा त्यांनीं दिलेल्या आश्रयाबद्दल मी अत्यंत आभारी आहे. चवथ्या आवृत्तीसही असाच आश्रय मिळून पुढील आवृत्तींत ह्याहीपेक्षां सुधारणा करून प्रसिद्ध करण्याचा लवकरच सुयोग येईल अशी मला आशा आहे.



वासुदेव सदाशिव पटवर्धन.



अण्णासाहेब किर्लोस्कर.

# गणपतीची पंचपदी.

१८०८

## धृपद.

प्रथम नमन गजानन अंबेचा तनय तया करुनि भावें ॥ गानें अचल मानसें निशिदिनीं ॥ प्रथम० ॥ धृ० ॥ गजवदन लंबोदर गणाधीश परशूधर ध्याति सदा विमल मनें सुरमुनिनर सुख पावे सदाशिव ॥ प्रथम० ॥ १ ॥ एकदंत तुंड व्याळ राजित सिंदूर भाल वसत सदा विबुध जनीं स्तवन करित यशोदासुत वासुदेव ॥ प्रथम० ॥ २ ॥

## पद २.

[ " गिरिधर ब्रिजधर "–या चालीवर. ]

सुरवर मुनिवर सकलहि नरवर ॥ स्तवन मनन तव करित निरंतर ॥ पाशांकुशधर, विघ्नहननकर ॥ धृ० ॥ दुष्ट असुर सिंदूर अवनिवर ॥ मत्त होत सुर कांपति थर थर ॥ हनन करिशि खल सगुणरूपधर ॥ सुरवर० ॥ १ ॥ अकार उकार मकार मिळुनी ॥ परब्रह्म ॐकार बनूनी ॥ तोंचि अससि तूं सिद्ध परात्पर ॥ सुरवर० ॥ ३ ॥

## पद ३.

( " दृ दृ तानाना तनदीम तानोम "– या चालीवर. )

गजवदन मयुरेश्वरा ॥ देवा करुनि सुदया करित विनया, माया,

भवभयहरा, देई मजासि थारा ॥ धृ० ॥ तव चरणीं शरण येई–ताप होई,—॥ अति मज सोसवे न कां नये करुणा मदंता–न बघा –धांव करुनि त्वरा ॥ १ ॥ तव विमल सुगुण गाया–शक्ति नाहीं, परि मन स्थिर न होइ दे तरि सुमती अहंता, न करीं दीन मजासि तारा ॥ २ ॥

## पद ४.

[ " अय् सरवर बरतर "–या चालीवर. ]

जय गजमुख, हरि दुःख मुषकवाहन सुख देत सदा प्रभु तो ॥ धृ० ॥ जगता, सुखदा, विपदा, ॥ हरणकरुनि दक्ष निशिदिनीं स्वजन अवनि राहे सदा ॥ जय गज ० ॥ रिद्धि सिद्धि नायक करि, भक्त, मुक्त दुरित हरि, गातां तरी ॥ जनन, मरण, मोचन, तारण, करितो मंगल स्मरणीं, निर्मल अंतःकरणीं, भावें स्मरा ॥ जय गज० ॥ २ ॥ नगजा, तनुजा, मनुजा, कुमति त्यजुनि, सुमति वरुनि, चरण स्मरुनि, सेवित जा ॥ जय गज ० ॥ ३ ॥ दास वासुदेव धरी, कांस तुझी, आस परीपूर्ण करी, भजन पूजन, करुनि कवन, सुमन, अर्पण करितें तुज स्वीकारी, भव भय संकट हारी पदनतजनकैवारी दया करा ॥ जय गज० ॥ ४ ॥

## पद ५.

[ हो जानत प्रीत० या चालीवर ]

तो वारिल अंतराय निमिषांतीं ॥ तो दंती शरणांतीं । सुख अंतीं । देइल प्रभु चिर शांती ॥ तो वारिल० ॥ धृ० ॥ करुणेश परेश गजानन

बिबुधावर हारिल भय खंती ॥ सुरवर मुनिवर । नरवर वंदी लंबोदर मुखदंती ॥ तो वारिल० ॥ १ ॥ अंकुश पाश विशोभित रक्षणिं दक्ष भक्त जन रक्षी ॥ गजवर सुखकर निशिदिनिं गातां अंतरेल भवभीती ॥ तो वारिल ० ॥ २ ॥

## पद ६.

[ ऐशी हरि करत दासपर प्रीती०—या चालीवर. ]

भावें सुरवर गणेश गुण गावे ॥ अवतरला भवानि उदरीं कनवाळु प्रभू गुणवंत विघ्नहर गावे ॥ धृ० ॥ भव तापा करि हरुनि मुक्त निज चरणपद्महीं दावी ॥ मूषक वाहन विनायकपदिं जावें । शरण; सतत पावे ॥ १ ॥ प्रभु त्याला अघदमन नाम गजवदन संतत शोभे । वंद्य जनीं तोचि प्रभू सुरमुनिमाजी । चरित विमल गावे ॥ २ ॥

# शिवाचीं पदें

## भजन ७

( राघाधर मधुमिलिंद जय जय रमारमण हरीगोविंद या चा. )

शिवांबशंकर शिवांब ॥ जयमृड हरांब शंकर हरांब ॥ धृ ॥ सुरमुनिकिन्नर कदंब सेवित स्वीकृत भक्तावलंब ॥ जय ० ॥ पदधृत नारायणांब काब्जसु ललित सुत हेरंब ॥ जय ० ॥ गंगाधर भोदिगंबरा धिप बलवद वनिका विलंब ॥ जय ० ॥

## अभंग ८

कैलासीं सिंव्हासनीं ॥ बैसलासे पिनाकपाणी ॥ धृ० ॥ अर्धांगीं गिरिजाकांता ॥ सुजटेवरि गंगामाता ॥ नंदीभृंगी ढाळिति चवरी ॥

पुढें तत्पर उभा शौरी ॥ सभोंवार सर्वहि गणते ॥ जय शब्दें नाचति भूतें ॥ सुरवैणिक पुढें गाती ॥ टाळमृदंग वीणाहातीं ॥ नारदादिक सुरमुनिसारे ॥ स्तुतिकरिती प्रेमभरें ॥ उभ्या जवळी देवांगना ॥ गेल्या विसरुनि देहभाना ॥ सुरआले तेत्तिसकोटी ॥ दर्शनाची झाली दाटी ॥ ऐसा उत्सह नित्य जेथें ॥ बलवंता नेई तेथें ॥ कैलासी० ॥

## पद ९

( दिसती जों जों शैलाची ही शिखरें स्पष्ट मला, या चा० )

निशा फार जाहली जाणुनि भोळया नाथासी ॥ नेत्रकटाक्षे सुचवी पार्वती यावें शेजेसी ॥ शेजमंदिरीं सर्व सिद्धता सत्वर मग केली ॥ सकल समूहासहित तेथें शिवमूर्ती आली ॥ काय वर्णु तेथिल ही शोभा मति कुंठित जाहली ॥ रत्नमंचकीं शिवानंदलहरी ती आरुढली ॥ वामांकावरी येउनि गौरी प्रेमानें बसली ॥ ब्रह्म संनिध चैतन्याची कळाची ती दिसली ॥ सुधे तुल्य ती दुग्ध शर्करा शिवासि पाजिवली ॥ उत्तम वासित थंड उटी मग देवा लावियली ॥ भक्तसंकटें हरोनि सर्वहि बहुताचे जी श्रमली ॥ ब्रह्मानंदीं मग्न शिवाख्या मूर्ती मग निजली ॥ सर्व गुणानीं पूर्ण तांबुला शिवासि खायाशी ॥ बलवंताची माता पार्वती उठली द्यायासी ॥ निशा फा० ॥

## विडा-पद १०.

( शाङरबा मित्रा हें सारे या चा० )

हात जोडुनी विनवी गिरिजा विडा घ्या देवा ॥ प्रेमभक्तिनें अर्पण केला आपण सेवावा ॥ धृ ॥ भक्तिनागवल्लींची पानें आणिलीं काढोनी ॥

चुना लाविला अहंकार मौक्तिकें जाळोनी ॥ ध्यानपटी जो शांतिजलानें शुद्धचि गाळोनी ॥ क्रोध सुपारी फोडुनि घातली राग कात पहावा ॥ हात० ॥ १ ॥ संसाराचा सर्व मसाला मध्यें मिसळीला ॥ वैश्वानर रूपत्वीं तुमच्या मुखिओरंगाला ॥ कीर्तिरूप वासानें सुखवित अपुल्या-वदनाला ॥ भक्तांवरिचा रक्तपणा तव अधरोष्ठीं न्यावा ॥ हात० ॥ २ ॥ भक्त काम कल्पद्रुम घेई विडा आनंदें ॥ सकल सुरांचा यूथ येउनी चरणी मग वंदे ॥ संतोषानें आशी दिधल्या ब्रह्माच्याकंदे ॥ भोचिद्रूपा या बलवंता मोक्षपथीं लावा ॥ हात० ॥ ३ ॥

## शेजारती पद. ११

( आरती भुवनसुंदराची या० चा० )

सुरवरमधुकर सत्कमला ॥ शेजारती करूं तुजला ॥ धृ ॥ राक्षित जटाजूट गंगा ॥ उमा वदनाब्ज दृष्टिभृंगा ॥ गुणगणमंडित भस्मांगा ॥ त्रिपुर मन्मथहरानिःसंगा ॥ चाल० ॥ कोटिरवि दीप्तिवदानें झळके ॥ फणामणी सर्वांगीं ठळके ॥ जेवि धगधगित ॥ विज झगझगित ॥ गौरी चकचकित ॥ चकत्रीविधि हरिनेत्राला ॥ शेजार० ॥ १ ॥ करनलकपाल सुखसदना ॥ चराचर गुरोपंचवदना ॥ खरतर रात्रिंचर कदना ॥ गणप मुखलोल कुंदरदना ॥ चा० ॥ रजतगिरिनिलय कालकाला ॥ निशाकरसंसेवित भाला ॥ दुंड सडसडित ॥ छाटिखडखडित ॥ डमरु गडगडित ॥ खडाडाध्वनी खडाक्वाला ॥ शेजारतीक० ॥ २ ॥ योगिहृत्कमलराजहंसा ॥ ओंवाळितों परमहंसा ॥ आदि मध्यांतरहितपूंसा ॥ महोरग वेष्टित शुच्यंसा ॥ चा० ॥ सकलसुर मंडन शिखिनयना

॥ निशामुख तांडव दिग्वसना ॥ झांजझंझनन ॥ मुरजधुंधनन ॥ गानितुंतनन ॥ श्रवण करि बलवत्‌गानाला ॥ शेजा० ॥ ३ ॥

## पद १२.

( आज परमरमणीय० द्या चा० राग आनंद भैरवी )

शिणलासि बहुविध वेष धरुनि आजवरीं निज कामारी ॥ धृ० ॥ भक्त समस्त मिळोनि रचिली शय्या अहिवरी ॥ कोमल पल्लव मृदुकर कमलीं तवपद पंकज चुरिही गौरी ॥ शि० ॥ १ ॥ भोग सुपूग फलादिक सारे असती शेजारी ॥ केशर चंदन वासितही उटी लावुनि योगाचि निद्रा करी ॥ शिण० ॥ २ ॥ जागविलें तुज आमुच्या काजा त्रासविलें भारी ॥ आत्मानंदी लावुनि डोळा बलवंतासह रमपुर वैरी ॥ शिण० ॥ ३ ॥

## पद १३.

ध्यावा मनी गुरु दत्त निरंजन ॥ अनुसूयात्मज देव दयाघन ॥ ध्यावा. ॥ ब्रम्हाविष्णुमहेश मिळुनी अवतरली त्रयमूर्ती त्रिभुवनी । तीते ध्यातां गातां निशिदिनी ॥ मोक्षपदाते नेईल अंती ॥ जटाजूट शिरी सुंदर कांती ऐसासुरवर अत्री नंदन ॥ १ ॥

ग्रंथसंग्रहालय ठाणे
शाखा



हिज हायनेस माधवराव महाराज शिंदे बहादूर.

## श्रीमंत सरकार माधवराव महाराज शिंदे आलीजाह बहादूर. जी. सी. एस. आय. यांच्या स्वागतार्थ

कै. वा. ना. डोंगरेकृत.

पद.

चाल ( स्मरुनि मनि गजमुखा. )

अजित कुल नरवरा । अजिखरा । शोभसि दिनमणि भरतभुवनि या जना सुखदयश धना मिति न तव ॥ धृ. ॥

माधव सम गुण निधान विलसे मतिबल अनुकुल असे रति सुगुणीं वसे सुनय मनि नसे दुरभिमद. ॥ १ ॥

श्रीकरुणेश्वर समाज हेतू इहपर चिरसुख नृपा मिळु विभव अपार भव जलधिपार करिशिव ॥ २ ॥ अजित. ॥

पद.

चाल ( क्षणभरि निवत गुण. )

नरवर । नितांत कुल रविचें । शोभाया । तव शुभदजनन । हितकर सुजना । प्रशांतकरि अरि अपार ॥ धृ. ॥

पटु मति तनु अति महादाता दया अमित रत हरि भजनीं कांतशांत धैर्यहि अवभय हृदयीं धरि सुपथा गुणिजनीं ममता वसवी जो कीं तो लोकीं ज्ञाता नितकरि जन सुख विचार. ॥ १ ॥

पद.

चाल ( जयदे जय देवी श्री. )

आगच्छतु । भवानत्र । अद्यनिशी । रंगसदसि । सादर तव स्वागतं हो ॥ वीरनरवरा । भो माधव । अतुल धीर मंदरा ॥ ध्रु. ॥

गालवमुनि । पुनितधरणि । तूं तिचा धनी ॥ १ ॥

महादजी शिवशंकर । दौलतजी श्रीकुबेर ॥

जनकोजी जनकनृपती । धनद तो खरा । जयाजी इंद्र दूसरा ॥ २

नयरीतीं विमलमती सुखसारिणि राजश्री ।

द्वारिं तिष्ठतीं । सदां द्वारिं तिष्ठती ॥

केशवा हे शिवा । माधवा द्या शुभ वर भूवरा ॥ ३ ॥

जगचालक नटनाटकी वासुदेविं शुद्धभाव प्रेमवृष्टी सत्प्रसाद हो ॥ ४ ॥

REFBK-0019489
REFBK-0019489



सिताराम नारायण बापट.